# प्रेसनोट

जा.क्र.स्थागुअशा/ 1122 /2020
पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग.
दुरध्वनी क्रमांक - 02362-228209
Email - cyber.sindhudurg@mahapolice.gov.in
दि. 17/04/2020.

कोरोना विषाणु संक्रमणाच्या पार्श्वभुमीवर मागील दिड ते दोन महिन्यापासुन सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दल आपले कार्यक्षेत्रात सतर्कपणे कर्तव्यावर आहे. दैनंदिन कर्तव्य बजावत असताना पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा जनतेशी संपर्क येत असतो. परंतु ज्या व्यक्तीशी आपण संपर्कात आलो आहे त्या व्यक्तीला कोरोनाची लक्षणे आहेत अगर कसे? हे माहित नसते.दैनंदिन कर्तव्य बजावत असताना नकळतपणे कर्तव्यावरील पोलीस कोणत्याही प्रकारे कोरोना विषाणुच्या संपर्कात येण्याची दाट शक्यता आहे. सदर संसर्गामध्ये वेळीच उपचार न झाल्यास यामध्ये मृत्युचीदेखील संभावना आहे.

या सर्व पार्श्वभुमीचा विचार करता, पोलीसांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याकरीता मा.पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी जिल्हयातील प्रत्येक पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या आरोग्याचा दैनंदिन आढावा घेण्यास सुरुवात केलेली आहे. यामध्ये कोणत्याही पोलीस अधिका-याला किंवा कर्मचा-याला मध्यम ते तीव्र खोकला,कोरडा खोकला, घशात खवखवणे, श्वास घेण्यास अडथळा,छातीत दुखणे , अशक्तपणा, ताप, इ.सारखी कोणतीही लक्षणे आढळुन आल्यास ती लक्षणे तात्काळ पोलीस अधीक्षक कार्यालयास कळविणे शक्य व्हावे याकरीता **Sindhudurg Health Checklist** या नावाने Online Spreadsheet तयार करण्यात आलेली आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा कोरोनामुक्त राहावा याकरीता अहोरात्र प्रयत्न करणा-या जिल्हयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांना कोणतीही प्राथमिक लक्षणे दिसुन आल्यास त्याचेवर वेळीच उपाययोजना करणे शक्य होणार आहे. तसेच कोणतीही प्राथमिक लक्षणे आढळुन आल्यास तात्काळ उपाययोजना म्हणुन जिल्हयातील काही वैद्यकीय अधिकारी यांचेशी मोबाईलव्दारे किंवा व्हीडीओकॉलव्दारे औषधांची माहिती घेऊन, टेलिमेडीसीन पुरविण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

(मा.पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग यांच्या मान्यतेने)

(सुनिल धनावडे)
पोलीस निरीक्षक,
स्थागुअशा व जनसंपर्क अधिकारी,
सिंधुदुर्ग

प्रत- जिल्हा माहिती अधिकारी,सिंधुदुर्ग